# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ३४१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–२०/०६/२०१६.

**१) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :–**

**अ)** दिनांक १९/०६/०१६ रोजी १७.१० वा. दरम्यान आरोपी मोटार सायकल चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल क्र. ३६ वाय ०६९७ ही दारू पिवुन दारूच्या नशेत कारधा टि पॉईंट येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आले. असे सर तर्फे फिर्यादि पोहवा. कळमकर वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. गोपाले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**ब)** दिनांक १९/०६/०१६ रोजी २०.४० वा. दरम्यान आरोपी मोटार सायकल चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल क्र. ३६ ई ७१८२ ही दारू पिवुन दारूच्या नशेत गिरोला येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आले. असे सर तर्फे फिर्यादि पोशि. गायधने, वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. मुटकुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) पोलीस कर्मचा–याचा मृत्यु . :–**

दिनांक १९/०६/०१६ रोजी १५.३० वा. दरम्यान ब्रिजमोहन कटरे वय ५३ वर्ष, रा. विनोबा नगर तुमसर हे पोलीस हवालदार या पदावर पोलीस स्टेशन गोबरवाही येथे तैनात होते. ते तुमसर वरून गोबरवाही कडे रोडने जात असतांना अचानक गाडी समोर रान डुक्कर आले त्यामुळे त्यांचे संतुलन बिघडुन ते खाली पडुन गंभिर जखमी झाले. त्यांना औषधोपचारा करीता सु.बो. दवाखाना तुमसर येथे भरती केले होते. परंतु उपचारा दरम्यान ते मरण पावले. डॉ. मेमो वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी पोहवा. धार्मीक पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) तरूणाचा मृत्यु. :–**

दिनांक १९/०६/०१६ रोजी पुर्वी अनोळखी इसम वय अंदाजे २५ ते ३० वयोगटातील याचे प्रेत कुजलेल्या अवस्थेत सोनेगाव जंगल शिवार येथील डोंगरदेव हुडकी कक्ष क्र. ७१ उपक्रमांक ५ मध्ये पडलेले असल्याची तक्रार फिर्यादी अरविंद धरमसिंग मडावी वय २८ वर्ष, रा. धनेगाव यांनी दिल्याने पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी पोउपनि. जाईले पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत. तपासा दरम्यान सदर इसम हा सोमा उर्फ सोमनाथ लक्ष्मण उके वय २८ वर्ष, रा. पैकाटोला जि. गोंदिया असल्याचे समजले.

४) विष प्राशन केल्याने उपचारा दरम्यान मृत्यु. :—

**अ)** दिनांक १५/०६/०१६ ते १८/०६/०१६ रोजी १२.४० वा. खुशाल बालाजी फुंडे वय ५९ वर्ष, रा. घोडेझरी याने किटकनाशक विष प्राशन केले त्यामुळे त्याला औषधोउपचार करीता लक्ष हॉस्पीटल भंडारा येथे भरती केले होते, परंतु उपचारा दरम्यान तो मरण पावला. डॉ. मेमो वरुन पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जा.फौ चे कागदपत्र पो.स्टे. पालांदुर येथे प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी पोहवा. राऊत पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**ब)** दिनांक १०/०६/०१६ रोजी १६.०० वा. दरम्यान मुलगी वय १७ वर्ष, हीने दि. १०/०६/२०१६ ला चर्च खातरोड भंडारा येथे विष प्राशन केल्यामुळे तीला औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले होते, परंतु उपचारा दरम्यान ती दि. १२/०६/२०१६ ला मरण पावली. पो.स्टे. अजनी जि. नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौ चे कागदपत्र पो.स्टे. भंडारा येथे प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी पोउपनि. गायकवाड पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक १९/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १६२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०३ केसस, तिन सिटर वाहनांवरती १२ केसेस व इतर वाहनांवरती १४७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

O/C

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.